# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
# जाहिरात

जा.क्र. रातुमनावि/म.वि.वि./जअतु २०१८–१९/४१९ दि. २३.०७.२०१८

## शैक्षणिक सत्र २०१८–१९ करिता जलदगती अतिरीक्त तुकडयांकरिता अर्ज मागविण्याबाबत

१२ वी च्या परीक्षेत मोठया संख्येने विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे व कोणताही विद्यार्थी ईच्छित उच्च शिक्षणापासुन वंचित राहु नये याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (८) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार जलदगती पध्दतीने अतिरीक्त तुकडयांना मान्यता देण्याबाबतचा निर्णय शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २०१७ अन्वये घेतला आहे. **त्यानुषंगाने सुचविण्यात येते की, ज्या संलग्नित महाविद्यालयांचे नॅक (NAAC)/एनबीए (NBA) मानांकन व मुल्यांकन तसेच पुनमल्यांकन झाले आहेत व अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमातील मुळ तुकडीच्या सर्व विषयाकरिता विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ शिक्षक उपलब्ध आहेत व मंजुर प्रवेश क्षमतेनुसार विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. परंतु महाविद्यालयात विद्यार्थी प्रतिक्षा यादीत आहेत, अशा सर्व संलग्नित महाविद्यालयांकडुन फक्त सत्र २०१८–१९ करिता जलदगती अतिरीक्त तुकडयांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.**

ज्या महाविद्यालयांना सत्र २०१८–१९ करिता अतिरीक्त तुकडीची आवश्यकता आहे. अशा महाविद्यालयांनी वित्त व लेखा विभागाकडे रु. १६००/– भरुन त्याचो पावती महाविद्यालयीन विकास विभाग येथे सादर करुन अर्जाची लिंक सुरु करण्याकरिता User ID व Password प्राप्त करुन घ्यावे. त्यानंतर विद्यापीठ अधिसूचना क्रमांक : लेखा/व्यय/सा/७०, दिनांक २७ एप्रिल, २०१२ नुसार रु. १०,०००/– अर्ज शुल्क लेखा विभागात भरुन **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org या संकेतस्थळावर Online College Section किंवा www.onlinebcudrtmnu.org या वेब पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात व आवश्यक असलेली कागदपत्रे अपलोड करुन दिनांक २७ जुलै, २०१८ च्या सायंकाळी ६.०० वाजेपर्यत ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच अर्जाची हार्ड कॉपी व सहपत्रे शुल्क भरलल्या पावतीसह सात प्रतीत दिनांक ३० जुलै, २०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत महाविद्यालयीन विकास विभाग येथे सादर करावी.**

**टिप :– ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रिय प्रवेश पध्दतीने करण्यात येतात तसेच ज्या अभ्यासक्रमांना शिखर संस्थेची (Appex Body) मान्यता असणे आवश्यक आहे. अशा अभ्यासक्रमांकरिता जलदगती अतिरीक्त तुकडीकरिता अर्ज करु नये.**

अर्ज करणाऱ्या महाविद्यालयांना अर्ज करतांना काही अडचणी आल्यास त्यांनी खालील नमुद कार्यालयात व दुरध्वनी क्रमांकावर (कार्यालयीन वेळेत) संपर्क साधावा.

१) महाविद्यालय विकास विभाग, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, **दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२, २५२२३९०**

२) Help Line No. ९४२२४४४२४३, ०८२७५०४४८३४.

मा. कुलगुरुंचे आदेशानुसार,

उपकुलसचिव
महाविद्यालय विकास विभाग
(अति.कार्यभार)